RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक २] मंगळवार, फेब्रुवारी ३, २०१५/माघ १४, शके १९३६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ फेब्रुवारी २०१५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक संकिर्ण. ५९१५/(२७)/का-१४.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६५ आणि अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती आणि मानधन) नियम, १९८४ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती आणि मानधन) (पहिली सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती आणि मानधन) नियम, १९८४ (यामध्ये यापुढे ज्याचा उल्लेख " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे), याच्या नियम १३ मध्ये,—

(एक) उप-नियम (एक) मध्ये " प्रत्येक जिल्ह्यासाठी " या मजकुरानंतर " आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासाठी मुख्य सादरकर्ता अधिकारी किंवा सादरकर्ता अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-नियम (२) मध्ये,—

(क) खंड (एक) मध्ये, " लघुवाद न्यायालय, बॉम्बे " या मजकुराऐवजी " लघुवाद न्यायालय, मुंबई " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (दोन) मध्ये, " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, बॉम्बे " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र न्यायाधिकरण, मुंबई " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (तीन) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"(चार) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातील मुख्य सादरकर्ता अधिकारी किंवा सादरकर्ता अधिकारी. ".

(तीन) उप-नियम (२) नंतर खालील उप-नियम समाविष्ट करण्यात येईल :—

"(२-अ) उप-नियम (२) मध्ये उल्लेखिलेल्या पदांकरिता उचित उमेदवाराची निवड सुकर करण्यासाठी, खालील तक्त्यात स्तंभ (१) मध्ये उल्लेखिलेल्या पदांसमोर, स्तंभ (२) मध्ये उल्लेखिलेली समिती ही उमेदवारांच्या मुलाखती घेईल आणि त्यांच्या मते, पदासाठी अधिक योग्य व गुणवत्तापूर्ण असतील अशा उमेदवारांच्या नावांची शासनाकडे शिफारस करील.

**तक्ता**

| अ. क्र. (१) | पदे (२) | मुलाखती घेण्यासाठी समिती (३) |
|---|---|---|
| १ | मुंबई उच्च न्यायालयातील आणि त्याच्या नागपूर व औरंगाबाद खंडपीठातील सरकारी वकील. . . . | (एक) महा अधिवक्ता; आणि<br>(दोन) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन. |
| २ | नगर दिवाणी न्यायालय, मुंबईकरिता सरकारी वकील व अतिरिक्त किंवा सहायक सरकारी वकील आणि लघुवाद न्यायालय, मुंबईकरिता सरकारी वकील. . . . | (एक) महाअधिवक्ता यांनी निर्देशित केलेली व्यक्ती ; आणि<br>(दोन) जिल्हाधिकारी, मुंबई शहर. |
| ३ | मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्याकरिता मुख्य सादरकर्ता अधिकारी किंवा सादरकर्ता अधिकारी. . . . | (एक) महाअधिवक्ता यांनी निर्देशित केलेली व्यक्ती ;<br>(दोन) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय ; आणि<br>(तीन) विधि सल्लागार-नि-सह सचिव. |

(चार) उप-नियम (३) ऐवजी, पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल:—

"(३) बृहन्मुंबईतील किंवा यथास्थिति, प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हादंडाधिकारी हा, बृहन्मुंबईसाठी, किंवा यथास्थिति, एखाद्या जिल्ह्यासाठी सरकारी वकिलाची किंवा अतिरिक्त सरकारी वकिलाची नियुक्ती करण्यासाठीच्या नामिकेमध्ये, शासनाच्या मान्यतेने, अभिवक्त्यांमधून योग्य उमेदवारांच्या नावांचा समावेश करण्याकरिता, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने, अभिवक्त्यांकडून अर्ज मागवील; आणि महाअधिवक्ता यांनी निर्देशित केलेली व्यक्ती व संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांचा समावेश असणारी समिती, नामिका उमेदवारांच्या मुलाखती घेईल आणि अशा नियुक्तीसाठी, त्यांच्या मते जे अधिक योग्य व गुणवत्तापूर्ण उमेदवार आहेत त्या उमेदवारांच्या नावांची शासनाकडे शिफारस करील; आणि शासन, अशा कोणत्याही नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांची निवड करील.";

(पाच) उप-नियम (४) ऐवजी, पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल :—

"(४) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा या जिल्ह्यांच्याव्यतिरिक्त प्रत्येक जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा, जिल्हा सरकारी वकील किंवा अतिरिक्त अथवा सहायक सरकारी वकील किंवा जिल्हा सरकारी वकिलाचा मानसेवी सहायक, किंवा यथास्थिति, दुय्यम सरकारी वकील यांची नियुक्ती करण्यासाठीच्या नामिकेमध्ये, शासनाच्या मान्यतेने, अधिवक्त्यांमधून योग्य उमेदवारांच्या नावांचा समावेश करण्याकरिता, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने, अधिवक्त्यांकडून अर्ज मागवील; आणि महाअधिवक्ता व संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांचा समावेश असणारी समिती, नामिका उमेदवारांच्या मुलाखती घेईल आणि अशा नियुक्तीसाठी, त्यांच्या मते जे अधिक योग्य व गुणवत्तापूर्ण उमेदवार आहेत त्या उमेदवारांच्या नावांची शासनाकडे शिफारस करील; आणि शासन, अशा कोणत्याही नियुक्तीसाठी अशाप्रकारे तयार केलेल्या नामिकेतून एका उमेदवाराची निवड करील.";

(सहा) उप-नियम (५) ऐवजी, पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल :—

" (५) कोकण विभागाचा आयुक्ताव्यतिरिक्त संबंधित महसूल विभागांचे आयुक्त हे, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई व्यतिरिक्त, संबंधित महसूल विभागांकरिता विशेष सरकारी वकीलाची नियुक्ती करण्यासाठीच्या नामिकेमध्ये, शासनाच्या मान्यतेने, अधिवक्त्यांमधून योग्य उमेदवारांच्या नावांचा समावेश करण्याकरिता, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने, अधिवक्त्यांकडून अर्ज मागवील; आणि महाअधिवक्ता यांनी निर्देशित केलेली व्यक्ती व कोकण विभागाचे आयुक्त यांचा समावेश असणारी समिती नामिका उमेदवारांच्या मुलाखती घेईल आणि त्यांच्या मते, अशा नियुक्तीसाठी, जे अधिक योग्य व गुणवत्तापूर्ण उमेदवार आहेत त्या उमेदवारांच्या नावाची शासनाकडे शिफारस करील ; आणि शासन, अशा कोणत्याही नियुक्तीसाठी अशाप्रकारे तयार केलेल्या नामिकेतून एखाद्या उमेदवाराची निवड करील. " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एम. ए. सईद

शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd February 2015

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Sankirna-5915/(27)/D-14.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 read with article 165 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the rules further to amend the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) (First Amendment) Rules, 2014.

2. In rule 13 of the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984 (hereinafter referred to as "the principal Rules"),—

(*i*) in sub-rule (1), after the words "for each district" the words "and Chief Presenting Officer or Presenting Officer for the Maharashtra Administrative Tribunals" shall be substituted ;

(*ii*) in sub-rule (2),—

(*a*) in clause (*i*), for the words "Court of Small Causes at Bombay ; and" the words "Court of Small Causes at Mumbai ; " shall be substituted;

(*b*) in clause (*ii*), for the words "the Maharashtra Revenue Tribunal at Bombay" the words "the Maharashtra Tribunal at Mumbai" shall be substituted;

(*c*) after clause (*iii*), the following clause shall be added, namely :—

"(*iv*) a Chief Presenting Officer or Presenting Officer in the Maharashtra Administrative Tribunal."

(*iii*) after sub-rule (2), the following sub-rule shall be inserted, namely :—

(2A) To facilitate the selection of a suitable candidate as the Government Pleader or Additional or Assistant Government Pleader or Honorary Assistant to the Government Pleader and Special Government Pleader and Additional Special Government Pleader mentioned in sub-rule (2), the Committee mentioned in column (2) against the posts mentioned in column (1) below Table, shall conduct the interviews of the candidates and recommend to the Government, the names of the candidates which in its opinion are most suitable and meritorious for the appointments.

*Table*

| Sr. No. | Posts | Committee for conducting interviews |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Government Pleaders in the High Court at Bombay and its Benches at Nagpur and Aurangabad. ... | (*i*) Advocate General; and<br>(*ii*) Principal Secretary and Remembrancer of Legal Affairs, Law and Judiciary Department, Government of Maharashtra ; |
| 2 | Government Pleaders and Additional or Assistant Government Pleaders for City Civil Court, Bombay and Government Pleader, Court of Small Causes at Mumbai. ... | (*i*) the person nominated by Advocate General; and<br>(*ii*) the Collector, Mumbai City ; |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| 3 | Chief Presenting Officer or Presenting Officer for the Maharashtra Administrative Tribunals at Mumbai, Nagpur and Aurangabad. ... | (*i*) the person nominated by Advocate General;<br>(*ii*) the Principal Secretary (Services), General Administration Department, Mantralaya; and<br>(*iii*) the Legal Adviser-*cum*-Joint Secretary, Law and Judiciary Department.”; |

(*iv*) for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :—

“(*3*) The District Magistrate in Brihan Mumbai, or as the case may be, in every district shall invite applications from advocates in such manner as he thinks fit, for inclusion of the names of suitable candidates from amongst them, with the approval of the Government, in the panel for appointment of Public Prosecutor or Additional Public Prosecutor for Brihan Mumbai, or as the case may be, for a district; and the Committee consisting of the person nominated by the Advocate General and the Collector of the concerned District, shall conduct the interviews of the candidates and recommend to the Government, the names of the candidates which in its opinion are most suitable and meritorious for such appointment; and the Government shall select the candidates recommended for any such appointment.”;

(*v*) for sub-rule (4), the following sub-rule shall be substituted, namely :—

“(*4*) The Collector of every district other than the district of the Mumbai City and the Mumbai Suburban District shall invite applications from advocates in such manner as he thinks fit, for inclusion of the names of suitable candidates from amongst them, with the approval of the Government, in the panel for appointment of District Government Pleader or Additional or Assistant Government Pleader or Honorary Assistant to District Government Pleader, or as the case may be, Subordinate Government Pleader; and the Committee consisting of the person nominated by Advocate General and the Collector of the concerned District shall conduct the interviews of the candidates and recommend to the Government, the names of the candidates which in its opinion are most suitable and meritorious for such appointment; and the Government shall, select a candidate from the panel so prepared for any such appointment.”;

(*vi*) for sub-rule (5), the following sub-rule shall be substituted, namely :—

“(*5*) The Commissioner of the concerned Revenue Division other than the Konkan Division shall invite applications from advocates in such manner as he thinks fit, for inclusion of the names of suitable candidates from amongst them, with the approval of the Government, in the panel for appointment of a Special Government Pleader for the concerned Revenue Tribunal other than Maharashtra Revenue Tribunal at Mumbai; and the Committee consisting of the person nominated by Advocate General and the Commissioner of Konkan Division shall conduct the interviews of the candidates and recommend to the Government, the names of the candidates which in its opinion are most suitable and meritorious for such appointment; and the Government shall select a candidate from the panel so prepared for any such appointment.”.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and R.R.A. to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष १, अंक ८] शुक्रवार, फेब्रुवारी १३, २०१५/माघ २४, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ३२

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ फेब्रुवारी २०१५

**शुद्धिपत्र**

क्रमांक संकीर्ण. ५९१५/(२७)/का-१४.— महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार-अ, असाधारण क्रमांक २४, दिनांक ३ फेब्रुवारी २०१५, पृष्ठ क्रमांक १ ते ४ वर प्रकाशित करण्यात आलेल्या शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक संकीर्ण ५९१५/(२७)/का-१४, दिनांक ३ फेब्रुवारी २०१५ मध्ये, पृष्ठ क्रमांक २ वरील,—

| | | | |
|---|---|---|---|
| " १ | मुंबई उच्च न्यायालयातील आणि त्याच्या नागपूर व औरंगाबाद खंडपीठातील सरकारी वकील. | . . . | (एक) महाअधिवक्ता; आणि<br>(दोन) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन.". |

या ऐवजी

| | | | |
|---|---|---|---|
| " १ | मुंबई उच्च न्यायालयातील आणि त्याच्या नागपूर व औरंगाबाद खंडपीठातील सरकारी वकील. | . . . | (एक) महाअधिवक्ता ; आणि<br>(दोन) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन. |
| १अ | मुंबई उच्च न्यायालयातील आणि त्याच्या नागपूर व औरंगाबाद खंडपीठातील अतिरिक्त सरकारी वकील, सहायक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता. | . . . | (एक) सह सचिव, विधि व न्याय विभाग ; आणि<br>(दोन) महाअधिवक्ता आणि प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्देशित केलेली व्यक्ती.". |

असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एम. ए. सईद,
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 13th February 2015

*CORRIGENDUM*

No. Sankirna-5915/(27)/D-14.— In Government Notification, Law and Judiciary Department, No. Sankirna-5915/(27)/D-14, dated the 3rd February 2015, published at pages 1-4 in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary Part IV-A, Extraordinary No. 24, dated the 3rd February 2015, on page 3, *for*

| | | | |
|---|---|---|---|
| " 1 | Government Pleaders in the High Court at Bombay and its Benches at Nagpur and Aurangabad. | ... | (*i*) Advocate General; and (*ii*) Principal Secretary and Remembrancer of Legal Affairs, Law and Judiciary Department, Government of Maharashtra ; " |

*Read*

| | | | |
|---|---|---|---|
| " 1 | Government Pleaders in the High Court at Bombay and its Benches at Nagpur and Aurangabad. | ... | (*i*) Advocate General ; and (*ii*) Principal Secretary and Remembrancer of Legal Affairs, Law and Judiciary Department, Government of Maharashtra ; |
| 1A | Additional Government Pleader, Assistant Government Pleader and Additional Public Prosecutor in the High Court at Bombay and its Benches at Nagpur and Aurangabad. | ... | (*i*) Joint Secretary, Law and Judiciary Department ; and (*ii*) The person nominated by the Advocate General and Principal Secretary and Remembrancer of Legal Affairs, Law and Judiciary Department, Government of Maharashtra;". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and R.L.A. to Government.

PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI. ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION,